**L. C. BILL No. I OF 2026.**

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक ४ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

२०१७ चा महा. ६. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, २०२६ चा महा. १. त्यांनी दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ;



(शा.म.मु.) एचबी ३१७३–१ (६००–३-२०२६)

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, १८ फेब्रुवारी २०२६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

२०१७ चा महा. ६.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, “मुख्य अधिनियम” असा केला आहे) याच्या कलम १०९ मध्ये, पोट-कलम (३) मधील,—

(१) खंड (घ) मधील, विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

“परंतु आणखी असे की, शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करिता, राज्य शासनास, १५ मार्च २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी इरादा पत्र देता येईल.”;

(२) खंड (छ) मधील, दुसरे परंतुक व तक्ता वगळण्यात येईल.

सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ याचे निरसन व व्यावृत्ती.

२०२६ चा महा. अध्या. १.

**३.** (१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ(सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ ( २०१७ चा महा. ६ ) याच्या कलम १०९ मध्ये, नवीन महाविद्यालय किंवा नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्र सुरू करण्यासाठी परवानगीच्या कार्यपद्धतींची तरतूद केलेली आहे. उक्त कलम १०९ च्या पोट-कलम ( ३ ) च्या खंड ( घ ) मध्ये अशी तरतूद केली आहे की, विद्यापीठाने शिफारस केलेल्या अर्जांपैकी, राज्य शासन, उक्त कलम १०९ च्या खंड ( ग ) अन्वये विद्यापीठाच्या शिफारशींनंतर लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी इरादा पत्र देऊ शकेल.

२. स्थानिक प्राधिकरणांच्या निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे, शासनास, विहित कालावधीत, इरादा पत्र देणे शक्य झाले नाही. म्हणून, शासनास, शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी उच्च शिक्षणाचे महाविद्यालय किंवा उच्च शिक्षण संस्था सुरु करण्याकरिता राज्य शासनाकडून इरादा पत्र देण्याचा दिनांक वाढविता यावा म्हणून, कलम १०९ च्या पोट-कलम ( ३ ) च्या खंड ( घ ) मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटले.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ ( सुधारणा ) अध्यादेश, २०२६ ( २०२६ चा महा. अध्या. १ ), हा प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमांत रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री.

## सन २०२६ चे वि.प.वि.क्रमांक १.— महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट.

## [महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यातील उतारे]

## (सन २०१७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६.)

**१.** ते **१०८.** *** *** *** ***

**१०९.** (१) व (२) *** *** *** ***

नवीन महाविद्यालय किंवा नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी सुरू करण्यासाठी परवानगी देण्याची कार्यपद्धती.

(३) (क) ते (ग) *** *** *** ***

(घ) विद्यापीठाने शिफारस केलेल्या अर्जांपैकी, राज्य शासनास, खंड (ग) अन्वये विद्यापीठाच्या शिफारशीनंतर, लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी इरादा पत्र देता येईल. इरादा पत्र मागणाऱ्या व्यवस्थापनाची योग्यता, उच्च शिक्षणाच्या परिसंस्थांच्या ठिकाणासंबंधातील राज्यस्तरीय अग्रक्रम इत्यादी प्रस्तुत घटक विचारात घेऊन, राज्य शासनास आपल्या निरपवाद स्वेच्छानिर्णयानुसार योग्य व उचित वाटेल त्याप्रमाणे अशा परिसंस्थाना इरादा पत्र देता येईल. राज्य शासनाकडून विद्यापीठाला, या खंडामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी इरादा पत्राविषयी कळविण्यात येईल :

परंतु, अपवादात्मक प्रकरणामध्ये व कारणे लेखी नमूद करून, उच्च शिक्षणाच्या महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला इरादा पत्र देण्यासाठी, विद्यापीठाने शिफारस न केलेल्या कोणत्याही अर्जास राज्य शासनाकडून मान्यता देता येईल;

(ङ) व (च) *** *** *** ***

(छ) खंड (च) खालील विद्यापीठाचा अहवाल विचारात घेतल्यानंतर, राज्य शासनाच्या अर्थसंकल्पीय तरतुदी, आणि इतर संबद्ध घटक, नवीन परिसंस्था चालू करण्याची परवानगी मागणाऱ्या व्यवस्थापनाची योग्यता इत्यादी लक्षात घेऊन, राज्य शासन, आपल्या निरपवाद स्वेच्छानिर्णयानुसार, त्यास योग्य आणि उचित वाटेल त्याप्रमाणे अशा व्यवस्थापनास अंतिम मंजुरी देऊ शकेल. या खंडाखालील अंतिम मंजुरी ही, असे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था चालू करण्याच्या प्रस्तावित वर्षाच्या १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी देण्यात येईल. अशी मान्यता राज्य शासनाकडून विद्यापीठाला कळविण्यात येईल. त्यानंतर दिलेल्या मान्यता ह्या, विद्यापीठाकडून केवळ त्यानंतरच्या शैक्षणिक वर्षातच अंमलात आणल्या जातील :

परंतु, तसेच अपवादात्मक प्रकरणांमध्ये आणि कारणे लेखी नमूद करून, राज्य शासनास, विद्यापीठाने शिफारस न केलेल्या कोणत्याही अनुपालन अहवालास मान्यता देता येईल.

" परंतु आणखी असे की, २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी, राज्य शासनाकडून अंतिम मान्यता देण्याचा दिनांक वाढवण्यासाठी खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये, विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (छ) मध्ये निर्दिष्ट केलेला दिनांक हा, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येईल :—

**तक्ता**

| खंड<br><br>(१) | विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेला दिनांक<br><br>(२) | २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद केलेला दिनांक<br><br>(३) |
|---|---|---|
| (छ) | ज्या वर्षी असे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्याचे प्रस्तावित केले असेल त्या वर्षाच्या १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी. | १५ जुलै २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी.”; |

(४) ते (९) *** *** *** ***

**११०.** ते **१४८.** *** *** *** ***

**अनुसूची.** *** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १.]**

**[महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री.]**

**[विधानपरिषदेने दिनांक ४ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव (३),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई